# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या १६९ व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत
## गुरुवार, दि. २२ फेब्रुवारी, २०२४ दुपारी ०३:३० वा.

NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १६९ वी बैठक (तातडीची) **गुरुवार, दि.२२ फेब्रुवारी, २०२४ रोजी दुपारी ०३:३० वा.** राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृहात मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. डॉ. प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | सदस्य | उपस्थित |
| २) | डॉ. लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ६) | प्रा. (डॉ.) बाळकृष्ण जगन्नाथ लोखंडे | सदस्य | उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार | सदस्य | उपस्थित |
| ८) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| १०) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | विनंतीनुसार अनुपस्थित |
| ११) | श्री. महादेव दऱ्याप्पा कमळे | सदस्य | अनुपस्थित |
| १२) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १३) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १४) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १६) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | अनुपस्थित |
| १७) | डॉ. नलिनी टेंभेकर, विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई नामनिर्देशित) | सदस्या | विनंतीनुसार अनुपस्थित |
| १८) | डॉ. शैलेंद्र देवळाणकर, मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य | अनुपस्थित |
| १९) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण) तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| २०) | सीए श्रेणिक हुकुमचंद शाह, वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | डॉ. मलिक सगाजी रोकडे प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २२) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले. तसेच डॉ. प्रशांत मारुती पवार, प्र.अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान संकुल यांची ही पहिलीच बैठक असल्याने त्यांचे व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा. कुलगुरु महोदय यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवून त्यांचे स्वागत करण्यात आले.

**अनुपस्थिती:**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस श्रीमती पद्मजादेवी मोहिते-पाटील व डॉ. नलिनी टेंभेकर, विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई नामनिर्देशित) यांनी दुरध्वनीद्वारे अनुपस्थिती कळविली होती, त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

**अभिनंदन:**

डॉ. शशिकात हरिश्चंद्र गायकवाड यांनी व्यवस्थापन परिषद सदस्यांच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठास प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA) योजनेअंतर्गत रु.१०० कोटी इतके अनुदान मंजूर झाल्याबद्दल विद्यापीठाचे मा.कुलगुरु, विद्यापीठ प्रशासन व प्रस्ताव तयार करणाऱ्या समिती सदस्य, अधिकारी / कर्मचारी यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडला. त्यास प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार यांनी अनुमोदन दिले.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०१ ] | अधिसभा सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांवर अधिसभेच्या बैठकीत उत्तरे देण्याकरिता व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.<br><br>टिपणी: अधिसभा सदस्यांनी अधिसभेच्या बैठकीकरिता प्रश्न पाठविलेले आहेत. सदर प्रश्नांची उत्तरे कार्यालयाने तयार केलेली आहेत. २०१९ चा एकरुप परिनियम क्रमांक ४ मधील नियम क्र. ६ (१३) नुसार, व्यवस्थापन परिषद अधिसभेच्या बैठकीत त्यांना द्यावयाची उत्तरे तयार करील.<br>सबब, अधिसभेच्या सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची अधिसभेच्या बैठकीत उत्तरे देण्याकरिता व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे नामनिर्देशनाची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | सोबत जोडल्याप्रमाणे प्रश्नांची उत्तरे निश्चित करण्यात आली व अधिसभेमध्ये या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी व्यवस्थापन परिषद सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आले. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०२ ] | **विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२२-२३ चा Annual Quality Assurance Report (AQAR) नॅक बेंगलोर यांच्या पोर्टलवर ऑनलाईनद्वारे भरण्याची बाब विचारार्थ.**<br><br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाचे दि.२० ते २२ जानेवारी, २०२२ रोजी नॅक बेंगलोर कडून २nd Cycle अंतर्गत मूल्यमापन करण्यात आलेले होते. सदरच्या मूल्यमापनामध्ये आपल्या विद्यापीठाला B++ (CGPA २.९६) मूल्यांकन (दर्जा) प्राप्त झालेला आहे. त्याअनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठाचे ३rd Cycle मधील शैक्षणिक वर्ष २०२२-२३ चा Annual Quality Assurance Report (AQAR) चे काम पूर्ण झाले आहे. सदरचा (AQAR) दि.२९/०२/२०२४ रोजीपर्यंत ऑनलाईनरित्या नॅक बेंगलोर यांच्या पोर्टलवर भरावयाचा आहे. सदरचा सन २०२२-२३ चा AQAR व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवणे गरजेचे आहे.<br>सबब, विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२२-२३ चा Annual Quality Assurance Report (AQAR) नॅक बेंगलोर यांच्या पोर्टलवर ऑनलाईनद्वारे भरण्याची बाब विचारार्थ. | आयक्युएसी विभाग |
| ठराव: | **विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२२-२३ चा Annual Quality Assurance Report (AQAR) नॅक बेंगलोर यांच्या पोर्टलवर ऑनलाईनद्वारे भरण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

मा. कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

२३/२/२०२४

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद

## अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व त्यावर विद्यापीठ प्रशासनाने तयार केलेली उत्तरे

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे | प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार |
| | प्रश्न १ | कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांच्या जयंती प्रित्यर्थ दिनांक ६ फेब्रुवारी २०२४ रोजी प्रस्तुत विद्यापीठात आयोजित केलेल्या डॉ. कोकाटे (शिवव्याख्याते व इतिहास अभ्यासक) यांचे व्याख्यान अचानक का रद्द करण्यात आले? त्याची कारणे कोणती? [ज्ञानस्रोत केंद्र] |
| | उत्तर | **प्रस्तुत विद्यापीठातील ज्ञानस्रोत केंद्राकडून कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या जयंती प्रित्यर्थ दि.६ फेब्रुवारी, २०२४ रोजी डॉ. श्रीमंत कोकाटे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सदरच्या व्याख्यानामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असता त्यामुळे डॉ. श्रीमंत कोकाटे यांचे व्याख्यान रद्द करण्यात आले.** |
| | प्रश्नः २ | प्रस्तुत विद्यापीठात आंतर विद्यापीठ, पश्चिम विभागीय स्पर्धा व इतर स्पर्धा मध्ये सहभागी होणाऱ्या क्रीडा संघाच्या प्रशिक्षण शिबिरात प्रशिक्षण देण्यासाठी त्या त्या क्रीडा प्रकारासाठी तज्ज्ञ प्रशिक्षक उपलब्ध आहेत काय? [क्रीडा व शारिरीक शिक्षण विभाग] |
| | उत्तर | **प्रस्तुत विद्यापीठात आंतर विद्यापीठ, पश्चिम विभागीय स्पर्धा व इतर स्पर्धामध्ये सहभागी होणाऱ्या क्रीडा संघाच्या प्रशिक्षण शिबिरात प्रशिक्षण देण्यासाठी संलग्नित महाविद्यालयातील त्या त्या क्रीडा प्रकारातील तज्ञ क्रीडा संचालकांची नेमणूक करुन सहभागी होणाऱ्या क्रीडा संघास प्रशिक्षण देण्यात येते.** |
| | प्रश्नः ३ | प्रस्तुत विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी झालेल्या कंत्राटी प्राद्यापक भरतीमध्ये आरक्षण नियमांचा योग्य रीतीने पालन करण्यात आले आहे का? [आस्थापना विभाग] |
| | उत्तर | **प्रचलित शासन निर्णयानुसार प्रस्तुत विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी झालेल्या कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक भरतीमध्ये आरक्षण नियमांचे योग्य रीतीने पालन करण्यात आले आहे.** |
| २) | डॉ. जैनोद्दीन खतालसो मुल्ला | डॉ. वसंत गुरुशांत कोरे |
| | प्रश्नः १ | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ ची प्रस्तुत विद्यापीठामध्ये अंमलबजावणी करण्यात आली आहे काय? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| | उत्तर | **होय.** |
| | प्रश्नः २ | दप्तर दिरंगाई प्रतिबंध अधिनियम २००५ ची प्रस्तुत विद्यापीठाने अंमलबजावणी केली आहे काय? [आस्थापना विभाग] |
| | उत्तर | **होय,** Maharashtra Government Servants Regulation of Transfers and Prevention of Delay in Discharge of Official Duties Act, **२००५ आणि शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशनानुसार नागरिकांची सनद अंतर्गत विद्यापीठाच्या विविध विभागाकडून / कार्यालयाकडून पुरविल्या जाणाऱ्या सेवांचा तपशिल विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.** |
| | प्रश्नः ३ | शिक्षक निवड समिती, CAS मूल्यांकन समिती, CAS निवड समिती व स्थानिक चौकशी समितीवर सप्टेंबर २०२३ पासून ते १५ फेब्रुवारी २०२४ पर्यंत महाविद्यालयनिहाय कोणकोणत्या व्यक्तींचे नामनिर्देशन झालेले आहे? [शिक्षक मान्यता व संलग्नता विभाग] |
| | उत्तर | **१. शिक्षक निवड समिती व कॅस मूल्यांकन समितीवर विद्यापीठाच्या संलग्नित असलेल्या विविध महाविद्यालयाने मागणी केल्यानुसार निवड समिती दिली जात असल्याने आपण विचारणा केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असून प्रत्येक महाविद्यालयाची स्वतंत्र नस्ती असल्याने नेमक्या कोणत्या महाविद्यालयाची माहिती पाहिजे त्याप्रमाणे उपलब्ध करुन देता येईल.**<br>**२. स्थानिक चौकशी समितीवर महाविद्यालयनिहाय व्यक्तींच्या नामनिर्देशनाची यादी सोबत जोडली आहे.** |

| | | | |
|---|---|---|---|
| ३) | डॉ.भगवान नागनाथ आदटराव | | डॉ. समाधान दिगंबर पवार |
| | प्रश्न १ | सात नोव्हेंबर २०२३ मधील सिनेटमधील ठरावानुसार काळा यादीत टाकलेले ऑन स्क्रीन एवोल्युशन चे सॉफ्टवेअर सध्या विद्यापीठात वापरले जात आहे का? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] | |
| | उत्तर | **विद्यापीठ प्रशासनाकडून कोणतेही सॉफ्टवेअर काळ्या यादीमध्ये टाकलेले नाहीत.** | |
| | प्रश्न: २ | सप्टेंबर २०२२ पासून चेंजेस इन स्टाफ कमिटीचे गठन STATUTE नुसार का करण्यात आले नाही? [शिक्षक मान्यता विभाग] | |
| | उत्तर | **१) शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीत चेजेंस इन स्टाफ करीता दि.१४/०९/२०२२ रोजी मा.कुलगुरु महोदयांच्या मान्यतेने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायद्याच्या कलम १२(७) नुसार समिती गठीत करण्यात आली होती.**<br>**२) चेंजिस इन स्टाफ समिती तीन वर्षासाठी गठीत करण्यात येते. दि.१४/०९/२०२२ रोजी गठीत समितीतील सदस्यांपैकी काही सदस्य सेवानिवृत्त झाले होते. दि.२६ जून, २०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या (ठराव क्र.२५) ठरावात नमुद केल्याप्रमाणे चेंजिस इन स्टाफ करीता नवीन समिती गठीत करण्याबाबत कायदेशीर सल्ला घेवूनच पुढील कार्यवाही करण्यात येण्याबाबत सर्वानुमते ठरले होते. तसेच सर्व विद्याशाखांचे अधिष्ठाता चेंजिस इन स्टाफ प्रस्तावातील कार्यवाही करतील असा ठराव करण्यात आला.** | |
| | प्रश्न: ३ | मा. कुलगुरु, मा.प्र कुलगुरु, मा. कुलसचिव सचिव, सहाय्यक कुलसचिव व इतर अधिकारी रजेवर जात असताना त्यांचा कारभार कोणाकडे दिला जातो? [कुलगुरु कार्यालय] | |
| | उत्तर | मा. कुलगुरु, मा.प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, सहाय्यक कुलसचिव व इतर अधिकारी रजेवर जात असताना त्यांचा कारभार खालीलप्रमाणे दिला जातो.<br>तसेच संबंधित अधिकारी वैयक्तिक रजेवर (Personl Leave) जात असतानाच त्यांच्या पदाचा पदभार इतर अधिकाऱ्याकडे दिला जातो, तथापि, ते कर्तव्य रजेवर (On duty) जात असतील त्यांच्या पदाचा पदभार दिला जात नाही. | |

| अ.क्र. | पद | पदभार देण्यात येणारे पद |
|---|---|---|
| १. | मा.कुलगुरु | मा.प्र-कुलगुरु किंवा वरिष्ठ प्राध्यापक |
| २. | मा.प्र-कुलगुरु | विद्यापीठातील सांविधिक अधिकारी किंवा वरिष्ठ प्राध्यापक |
| ३. | कुलसचिव | विद्यापीठातील समकक्ष सांविधिक अधिकारी किंवा सेवाजेष्ठ उपकुलसचिव |
| ४. | सहाय्यक कुलसचिव | समकक्ष अधिकारी किंवा कक्ष अधिकारी |
| ५. | इतर अधिकारी | त्या त्या पदाच्या समकक्ष अधिकारी |

| | | | |
|---|---|---|---|
| ४) | डॉ. शिरीष विठ्ठल शिंदे | | डॉ. सुशिल कुमार शिंदे |
| | प्रश्न १ | OCT/NOV २०२२ व मार्च २०२३ च्या सर्व परीक्षांची गुणपत्रके व महाविद्यालय निहाय निकालाचे लेजर संबंधित महाविद्यालयास वितरित करण्यात आले आहेत काय? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] | |
| | उत्तर | **गुणपत्रके वितरीत करण्यात आली आहेत व लेजर छपाई करण्यात येत आहे.** | |
| | प्रश्न: २ | २३-१०-१९९२ ते ०३-०४-२००० या कालावधीत नियुक्त बिगर नेट सेट अधिव्याख्यात्यांची सेवा नियुक्तीच्या दिनांक पासून धरुन दिनांक २९-१०-२०२१ च्या शासन निर्णयानुसार कायम केल्यासंबंधी मागवलेल्या प्रस्तावावर विद्यापीठाने काय कार्यवाही केली [शिक्षक मान्यता विभाग] | |
| | उत्तर | **प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित सर्व अनुदानित महाविद्यालयांचे २३-१०-१९९२ ते ०३-०४-२००० या कालावधीत नियुक्त बिगर नेट/सेट अध्यापकांचे प्रस्तावाची छाननी करण्याकरीता विद्यापीठस्तरावर समिती गठीत करण्यात आली होती. परंतु गठीत समितीचे अध्यक्ष डॉ. एल. बी. दामा यांची प्रस्तुत विद्यापीठाच्या प्र-कुलगुरु पदी निवड झाली असल्याने त्यांच्या ऐवजी नामनिर्देशन घेण्यात आली असून समितीची बैठक दि.२६/०२/२०२४ रोजी घेण्यात येणार आहे.** | |

| | | |
|---|---|---|
| | प्रश्न: ३ | महाराष्ट्र शासन परिपत्रक दिनांक ८ जुलै २०१९ नुसार प्रति महिना CAS कॅम चे आयोजन विद्यापीठाने का केले नाही? [शिक्षक मान्यता विभाग] |
| | उत्तर | **सदर विषयाबाबत प्रशासकीय कार्यवाही सुरु आहे.** |
| ५) | **डॉ. श्रीमती सीमा अण्णासाहेब गायकवाड** | **श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील** |
| | प्रश्न १ | प्रस्तुत विद्यापीठात सप्टेंबर २०२२ पासून Statute Committee च्या किती बैठका घेण्यात आल्या? [सभा व निवडणूका विभाग] |
| | उत्तर | **एकही नाही.** |
| | प्रश्न: २ | सप्टेंबर २०२२ पासून प्राचार्य निवड समितीवर किती अपात्र व्यक्तींचे नामनिर्देशन करण्यात आले आहे? [शिक्षक मान्यता विभाग] |
| | उत्तर | **सप्टेंबर २०२२ पासून प्राचार्य निवड समितीवर कोणतेही अपात्र व्यक्तींचे नामनिर्देशन करण्यात आलेले नाही.** |
| | प्रश्न: ३ | प्रस्तुत विद्यापीठात सप्टेंबर २०२२ पासून Standing Committee ची एकही बैठक घेण्यात आलेली नाही त्याची कारणे काय आहेत? [सभा व निवडणूका विभाग] |
| | उत्तर | **विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणावरील रिक्त पदे भरण्यासाठी दि.२९/०२/२०२४ पर्यंत सर्व संलग्नित महाविद्यालयांकडून माहिती मागविण्यात आली असून माहिती प्राप्त झाल्यानंतर माहे मार्च, २०२४ मधील पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात बैठक घेण्याचे नियोजन आहे.** |
| ६) | **श्री. सिध्देश्वर बाबु स्वामी** | **प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार** |
| | प्रश्न १ | प्रस्तुत विद्यापीठामध्ये विद्यार्थ्यांनी फोटोकॉपीची मागणी केल्यानंतर ती किती दिवसात विद्यार्थ्यांना देण्याचे नियम आहे? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| | उत्तर | **विद्यार्थ्यांनी फोटोकॉपीची मागणी केल्यानंतर अध्यादेश क्र.०.१०६(ब) नुसार १५ दिवसात देण्याचे नियम आहे.** |
| ७) | **ॲड. उषा नंदकुमार पवार** | **डॉ. प्रशांत मारुती पवार** |
| | प्रश्न १ | प्रस्तुत विद्यापीठात N+२ च्या निर्णयानुसार अद्याप २१५ विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली गेलेली नाही, सदर कामात कसूर करणाऱ्या परीक्षा व मूल्यमापन नियंत्रक किंवा संबंधित कर्मचाऱ्यावर विद्यापीठाने कोणती कार्यवाही केली आहे? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| | उत्तर | **N+२ च्या निर्णयानुसार विद्यार्थ्यांचे निकाल प्रसिध्द करण्यात आलेले आहेत.** |
| | प्रश्न: २ | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील कलम ४४ नुसार प्रस्तुत विद्यापीठाने बोर्ड ऑफ पोस्ट ग्रॅज्युएट एज्युकेशन इन कॉलेजेस याची स्थापना केली आहे काय? [अभ्यासमंडळे विभाग] |
| | उत्तर | **होय, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ४४(३) नुसार प्रस्तुत विद्यापीठाने पत्र क्र.पुअहोसोवसो/अमंवि/२०२१/५३९८, दि.३०/०७/२०२१ अन्वये महाविद्यालयीन पदव्युत्तर शिक्षण मंडळाची स्थापना केली होती. तथापि, सन २०२२-२३ मध्ये अभ्यासमंडळे नव्याने गठीत करण्यात आल्याने महाविद्यालयीन पदव्युत्तर शिक्षण मंडळाची स्थापना नव्याने करण्याचे काम अभ्यासमंडळे विभागाकडून सद्यस्थितीत सुरु आहे.** |
| | प्रश्न: ३ | विद्यापीठ कायदा २०१६ मधील सेक्शन ५८(९) नुसार २०१७ पासून क्रीडा, सांस्कृतिक इ. विद्यार्थ्यांसाठी वेगळ्या परीक्षांचे आयोजन किती वेळा करण्यात आले आहे? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| | उत्तर | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये कलम ५८(९) दिसून येत नाही.** |
| ८) | **श्री. अजितकुमार बापूराव संगवे** | **श्री. सचिन मारुती गायकवाड** |
| | प्रश्न १ | विद्यापीठाच्या वेबसाईटमध्ये क्रीडा विभागाच्या कामगिरीची व अहवालाची २०२०-२१ नंतरची माहिती अपडेट न करण्याचे कारण काय आहे? [क्रीडा व शारिरीक शिक्षण विभाग] |
| | उत्तर | **विद्यापीठाच्या वेबसाईटमध्ये क्रीडा विभागाच्या कामगिरीची व अहवालाची २०२०-२१ नंतरची माहिती काही तांत्रिक कारणामूळे राहून गेली होती ती सध्या अपडेट केलेली आहे. भविष्यात याची काळजी घेण्यात येईल.** |

| | | |
|---|---|---|
| | प्रश्न: २ | २०२३-२४ या वर्षामध्ये राज्य क्रीडा महोत्सवापूर्वी झालेल्या आंतरविद्यापीठ स्पर्धेस विद्यापीठाचे संघ जाताना संघातील खेळांडूना गणवेश दिला नाही याचे कारण काय आहे? [क्रीडा व शारिरीक शिक्षण विभाग] |
| | उत्तर | **२०२३-२४ या वर्षामध्ये राज्य क्रीडा महोत्सवापूर्वी झालेल्या आंतर विद्यापीठ स्पर्धेस विद्यापीठाचे संघ जाताना संघातील खेळाडूंना गणवेश दिलेले आहेत.** |
| | प्रश्न: ३ | आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत विद्यापीठाचे संघ जाताना त्यांचे प्रवासाचे आरक्षण वेळेत न करण्याचे कारण काय आहे? [क्रीडा व शारिरीक शिक्षण विभाग] |
| | उत्तर | **आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेच्या तारखा या लवकर घोषित होत नाहीत, झाल्यास अगदी निकटच्या तारखा घोषित होतात. त्या उपरोक्तही लांबवल्याचा प्रवास विचारात घेता संबंधित संघव्यवस्थापक, प्रशिक्षकांच्या विनंतीनुसार ज्यांना तात्काळ आरक्षण कोठ्यातून प्रवास करण्यास परवानगी देण्यात आली आहे.** |
| ९) | श्रीमती शोभा बोल्ली | श्री. सचिन मारुती गायकवाड |
| | प्रश्न १ | नोव्हेंबर २०२३ च्या परीक्षेच्या गुणपत्रिकेत चुकीचे गुण नमूद केल्याने विद्यापीठाची विविध माध्यमातून जी बदनामी झाली आहे त्यास जबाबदार कोण? त्यावर काय कार्यवाही करण्यात आली? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| | उत्तर | **नोव्हेंबर, २०२३ या सत्रातील गुणपत्रिका अद्यापपर्यंत वाटप केलेल्या नाहीत. गुणपत्रिकेमध्ये चुकीचे गुण गेलेले नाहीत. याबाबत विभागाकडून पूर्ण खात्री करुन चुकीचे गुणपत्रिका जाणार नाहीत याची दक्षता घेण्यात येईल.** |
| १०) | ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे |
| | प्रश्न: १ | आपल्या विद्यापीठाने किंवा विद्यापीठातील विविध विभागाने किती संस्थांशी सामंजस्य करार केलेले आहेत व त्यातून किती प्लेसमेंट झालेले आहे? [नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ] |
| | उत्तर | **प्रस्तुत विद्यापीठातील विविध विभागाने एकूण ६९ सामंजस्य करार केलेले आहेत व त्यातून प्लेसमेंटची प्रक्रिया सुरु आहे.** |
| ११) | श्री. सुदर्शन मसु यादव | डॉ. सुशिल कुमार शिंदे |
| | प्रश्न १ | विद्यापीठ परिसरातील कॅन्टीन आणि मेसची टेंडर प्रक्रिया झाल्या नंतर टेंडर भरणाऱ्यास नियमाप्रमाणे कॅन्टीन आणि मेस दिले गेले आहे का? [अभियांत्रिकी विभाग] |
| | उत्तर | **होय.** |
| | प्रश्न: २ | मेस बाबत जी कोणती समिती गठीत केली होती त्या समितीचा अहवाल आल्यानंतर कारवाही पूर्ण झाली की त्याच्या आधीच कॅन्टीन दिले गेले? [अभियांत्रिकी विभाग] |
| | उत्तर | **मेसच्या जेवणाचा दर्जा तपासणी करण्यासाठी नेमलेल्या समितीचा अहवाल आल्यानंतर वसतिगृहातील मेस सुरु करणेबाबत कार्यारंभ देण्यात आला आहे.** |
| १२) | डॉ. विरभद्र चनबस दंडे | डॉ. समाधान दिगंबर पवार |
| | प्रश्न १ | व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये वारकरी संप्रदाय अभ्यास केंद्र सुरु करण्याचा ठराव मंजूर झाला होता त्याची सद्यस्थिती काय आहे? [आस्थापना विभाग] |
| | उत्तर | **दि.२६ जून, २०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विषय क्र.३५(८) वर पारित झालेल्या ठरावानुसार वारकरी संप्रदायाचे अभ्यास केंद्राच्या प्रस्तावाचा मसुदा तयार करणेकामी समिती गठीत करण्यात आले असून, सदर समितीच्या मा. अध्यक्ष व सदस्यांना दि.३१ जुलै, २०२३ च्या पत्रान्वये आपल्या सोयीची तारीख व वेळ निश्चित करुन मिळावी जेणेकरुन बैठकीचे आयोजन करणे सोयीचे होईल असे कळविण्यात आले आहे. मा. अध्यक्षांनी तारीख आणि वेळ कळविल्यास तात्काळ बैठकीचे आयोजन करण्यात येईल.** |

| | | | |
|---|---|---|---|
| १३) | श्री. चनबसप्पा गुंडप्पा बंकुर | | डॉ. वसंत गुरुशांत कोरे |
| | प्रश्न १ | विद्यापीठ प्रशासन अधिकार्याचा पदानुक्रम काय आहे? [आस्थापना विभाग] | |
| | उत्तर | विद्यापीठ प्रशासन अधिकाऱ्यांचा पदानुक्रम खालीलप्रमाणे आहे.<br>१) कुलगुरु २) प्र-कुलगुरु ३) कुलसचिव ४) संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ / वित्त व लेखा अधिकारी / संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहयर्च मंडळ / संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र / संचालक, विद्यार्थी विकास / संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण / संचालक, राष्ट्रीय सेवा योजना ५) उपकुलसचिव ६) सहायक कुलसचिव ७) कक्ष अधिकारी | |
| | प्रश्न: २ | विद्यापीठ परिसरातील शिक्षकांचे वर्कलोड वेळोवेळी तपासले जाते का? आणि त्याप्रमाणे शिकवणे व अन्य कामांचे नियोजन केले जाते का? [आस्थापना विभाग] | |
| | उत्तर | होय, प्रस्तुत विद्यापीठ परिसरात विविध संकुलात कार्यरत असलेले संचालक त्या त्या संकुलातील कार्यभाराची समीक्षा करुनच अध्यापनाचे तास निश्चित करतात व वेळापत्रक ठरवितात. | |
| १४) | डॉ. मंगेश मोहन वेदपाठक | | डॉ. प्रशांत मारुती पवार |
| | प्रश्न १ | आपल्या विद्यापीठाच्या चालू पंचवार्षिक बृहत आराखड्यामध्ये नमूद करण्यात आलेल्या आपल्या विद्यापीठ परिसराला कार्बन उत्सर्जन मुक्त करण्याच्या संकल्पनेला अनुसरुन कोण कोणती पावले उचलली आहेत? [संलग्नता विभाग/भूशास्त्र संकुल] | |
| | उत्तर | १. शासनाच्या धोरणानुसार डॉ. नरेंद्र जाधव समितीच्या शिफारशी, नवीन शैक्षणिक धोरण २०२० व विद्यापीठ अधिनियमातील तरतूदीनुसार कौशल्य आधारित व रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांना प्राधान्य देऊन त्याच्या निकषानुसार सर्वेक्षणासह सम्यक योजना अधिष्ठाता मंडळाने तयार केलेली असून त्यास व्यवस्थापन परिषद, विद्यापरिषद व अधिसभेच्या मान्यतेअंती शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. त्यास मंजूरी देखील मिळालेली आहे. सदरचा बृहत आराखडा नवीन महाविद्यालयासाठी लागू असून कार्बन उत्सर्जन मुक्त करण्याच्या संकल्पनेला लागू होत नाही.<br>२. कार्बन उत्सर्जन कमी करण्याच्या दृष्टीने विद्यापीठांमध्ये वृक्षारोपणाच्या माध्यमातून जास्तीत जास्त हवेतील तसेच विद्यापीठ परिसरातील कार्बनचे प्रमाण कमी करण्यासाठी जंगली झाडे फळझाडे व औषधी वनस्पतीची विद्यापीठ परिसरामध्ये एनएसएस च्या माध्यमातून लागवड केली जाणार आहे तसेच या वनस्पतींच्या माध्यमातून आर्थिक व पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मदत होणार आहे यानुसार विद्यापीठाचे ग्रीन ऑडिट व तसेच कार्बन क्रेडिटच्या दृष्टीने त्याचा फायदा होणार आहे. | |

***

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर